निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक २७४ * किंमत - २ रु RNI.No. MAH/MAR2014/56289 * गुरूवार दि.०५ फेब्रुवारी २०२६ * पाने-४

# बंद दारामागे न्याय रडकुंडीला आलाय!

## ममता बॅनर्जींनी सरन्यायाधीशांसमोर स्वत:च मांडली निवडणूक आयोगाविरोधात बाजू

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली** – मतदार यादीच्या विशेष सखोल फेरतपासणीविरोधात पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जी यांनी आवाज उठवला आहे. याविरोधात त्या सर्वोच्च न्यायालयात गेल्या असून त्यांनी कोर्टातही निवडणूक आयोगावर सडकून टीका केली. बंद दाराआड न्याय रडत आहे, असं त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या समोर म्हटलं.

ममत बॅनर्जी यांनी सरन्यायाधीशांकडे ५ मिनिटे बोलण्यासाठी वेळ मागितला. त्यानुसार, सरन्यायाधीशांनी त्यांना खंडपीठासमोर बोलण्यासाठी १५ मिनिटे दिली. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगाच्या विरोधात जोरदार युक्तीवाद केला. ''समस्या अशी आहे की शेवटी आपल्याला कुठेही न्याय मिळत नाही. मी निवडणूक आयोगाला सहा वेळा पत्र लिहिले आहे पण तरीही कोणतेही उत्तर मिळालेले नाही'', असं ममता बॅनर्जी म्हणाल्या.

बॅनर्जी यांची याचिका खरी असल्याचे खंडपीठाने मान्य केले आणि प्रत्येक मुद्द्यावर तोडगा निघण्याबाबत खात्री दिली. बॅनर्जी यांच्या याचिकेवर न्यायालयाने निवडणूक आयोगाला नोटीसही बजावली. पुढील सुनावणी सोमवारी ठेवण्यात आली आहे. निवडणूक आयोगाकडून बंगालला ''लक्ष्य'' केले जात आहे आणि एसआयआर बंगालच्या लोकांना ''बुलडोझ'' करण्यासाठी आहे, असा युक्तीवाद ममता बॅनर्जी यांनी केला.

''निवडणूक आयोगाने ५८ मतदारांना वगळलं आहे. त्यांच्याकडे फॉर्म ६ देखील अपील करण्याची संधी नाही. ते फक्त बंगालला लक्ष्य करत आहेत. फक्त बंगालसाठी त्यांना सूक्ष्म निरीक्षक नियुक्त केले आहेत. फक्त बंगालसाठी त्यांनी बंगालच्या लोकांना चिथावण्यासाठी हे सूक्ष्म निरीक्षक नियुक्त केले आहेत. माझे निवेदन हे आहे की तार्किक विसंगतीचा खटला हटवू नये आणि तो सूक्ष्म निरीक्षकांनीच तो स्पष्ट करू नये'', असे ममता बॅनर्जी यांनी भारताचे मुख्य न्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची आणि विपुल पंचोली यांच्या खंडपीठासमोर सादर केले.

सीजेआय सूर्यकांत म्हणाले, ''सर्व नोटिसा मागे घेणे अव्यवहार्य आहे. निवडणूक आयोगाने नावाच्या स्पेलिंगच्या चुकांसाठी नोटिसा जारी करू नयेत. निवडणूक आयोगाने त्यांच्या अधिकाऱ्यांना संवेदनशील राहण्याचे निर्देश देखील द्यावेत. जर राज्य सरकारने बंगाली आणि स्थानिक बोलीभाषा जाणणाऱ्या लोकांची एक टीम उपलब्ध करून दिली, जी चौकशी करू शकेल आणि निवडणूक आयोगाला कळवू शकेल की ही चूक स्थानिक बोलीभाषेमुळे झाली आहे.'' जर स्थानिक बोलीभाषांच्या एआय भाषांतरामुळे हे घडत असेल, तर आम्ही त्यावर उपाय शोधू. यामुळे खऱ्या मतदारांना वगळले जाऊ नये.

ममता बॅनर्जी यांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रानुसार, १९७९ मध्ये कलकत्ता विद्यापीठातून एमए पूर्ण केल्यानंतर, त्यांनी कोलकाता येथील जोगेश चंद्र चौधरी महाविद्यालयात एलएलबी अभ्यासक्रमात प्रवेश घेतला. १९८२ मध्ये त्यांनी एलएलबी पूर्ण केले.

मुख्यमंत्र्यांनी वैयक्तिकरित्या उपस्थित राहून युक्तिवाद करण्याची परवानगी मागणारा अंतरिम अर्ज देखील दाखल केला आहे. ममता बॅनर्जी यांनी त्यांच्या अर्जात म्हटले आहे की कलम ३२ रिट याचिकेतील याचिकाकर्त्या म्हणून त्यांना या प्रकरणाची पूर्ण माहिती आहे. त्या म्हणतात की पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि टीएमसी अध्यक्षा म्हणून त्यांना सर्वोच्च न्यायालयाचे कामकाज समजते आणि ते स्थापित नियमांनुसार काम करतील.

# दुय्यम निबंधक अधिकाऱ्यांच्या मौनसंमतीने दलाल मोकाट? प्रशासनाच्या नियंत्रणावरच सवाल




**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट** – ''घरचा माणूसच जर पाय ओढत असेल, तर बाहेरचा काय कमी करणार?'' ही म्हण आज किनवटच्या दुय्यम निबंधक कार्यालयाच्या कारभाराला तंतोतंत लागू पडते. रजिस्ट्री कार्यालयात चाललेले गैरप्रकार दलालांमुळे नव्हे, तर संबंधित अधिकाऱ्यांचे दलालांशी असणारे हितसंबंध,ढिसाळ, बेफिकीर आणि सोयीस्कर मौनामुळेच वाढल्याचा सूर आता नागरिकांतून उमटत आहे.

शासनाचे कार्यालयीन नियम आणि अटी शर्थी असताना प्रत्यक्षात मात्र ''जसं चालेल तसं'' व्यवहार सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. शनिवार-रविवार, शासकीय सुटी, कार्यालयीन वेळाया सगळ्या गोष्टी किनवटच्या दुय्यम निबंधक कार्यालयात कागदावरच उरल्यासारख्या वाटतात. दलालांना चेहरा नसतो पण अधिकाऱ्यांना असतो, त्यामुळे अधिकारी जागेवर नसताना व्यवहार कसे होतात, हा प्रश्न दलालांपेक्षा थेट प्रशासनालाच धारेवर धरणारा आहे.

शासनाने गावठाण रजिस्ट्रीवर बंदीचे आदेश काढले असतानाही गावठाण रजिस्ट्री बेकायदेशीरपणे केल्या जात असल्याचे आरोप असून, खरेदी-विक्री कागदपत्रांचे व्हॅल्यूएशन मुद्दाम कमी दाखवून रजिस्ट्री लावल्या जात असल्याचेही बोलले जात आहे. ज्यामुळे अधिकऱ्यांच्या दलालांशी असणाऱ्या हिटसंबंधाचा फटका थेट शासनाच्या महसुलाला बसतोय, आणि यामुळेच ''कागदावर सगळं कायदेशीर, पण खिशातून पैसे बाहेर गेले कीच काम होतं,'' अशी चर्चा वजा तक्रार दबक्या आवाजात ऐकायला मिळत आहे.

नोव्हेंबर व डिसेंबर २०२५ या दोन महिन्यांत किनवट रजिस्ट्री कार्यालयात नेमक्या किती रजिस्ट्री झाल्या, त्या कोणाच्या नावावर, कोणत्या दराने आणि कोणत्या नियमांत बसून झाल्या, याची चौकशी व्हायलाच हवी, अशी ठाम मागणीहोत आहे. मागील काही महिन्यांच्या सर्व रजिस्ट्रींचे ऑडिट व व्हॅल्यूएशन तपासणी झाली, तर बरीच कुज उघडी पडेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. नोंदणी विभागावर लोकांचा विश्वास हीच प्रशासनाची खरी शिदोरी आहे. ती जर अशा प्रकारे उधळली जात असेल, तर वरच्या पातळीवरून वेळेत लगाम घातला जाणार का, हाचं सवाल आहे.

# देवस्थान ट्रस्ट उद्योग नाही : सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली** – देवस्थान ट्रस्ट हे औद्योगिक विवाद कायद्याच्या कक्षेत येत नाही. त्यामुळे अशा ट्रस्टला उद्योग मानले जाऊ शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. एका लेखापालास विनाचौकशी सेवेतून कमी केल्याच्या प्रकरणात न्यायालयाने हा निर्णय दिला असला, तरी संबंधित कर्मचाऱ्याला १२ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेशही न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती प्रसन्ना बी. वराळे यांच्या खंडपीठाने दिले.

लाईव्ह लॉच्या रिपोर्टनुसार, अपीलकर्त्याची लक्ष्मीनारायण देव ट्रस्टमध्ये लेखापाल म्हणून नियुक्ती झाली होती. सलग १२ वर्षे सेवा केल्यानंतर, १ नोव्हेंबर १९९९ रोजी कोणतीही पूर्वसूचना किंवा चौकशी न करता त्यांना मौखिकरीत्या कामावरून काढून टाकण्यात आले. त्यानंतर त्यांनी कामगार आयुक्तांकडे धाव घेतली होती. वादाच्या काळात ट्रस्टने त्यांची बदली दूरवरच्या ठिकाणी केली होती.

२००९ मध्ये कामगार न्यायालयाने लेखापालाचा दावा फेटाळला होता. ''संबंधित ट्रस्ट ही एक धार्मिक आणि धर्मादाय संस्था असल्याने ती औद्योगिक विवाद कायद्याच्या कलम २(जे) नुसार उद्योग ठरत नाही. येथे कोणतेही उत्पादन किंवा नफा कमावण्याचे काम चालत नाही,'' असे कामगार न्यायालयाने म्हटले होते. गुजरात उच्च न्यायालयाच्या एकल खंडपीठाने आणि त्यानंतर विभागीय खंडपीठानेही हाच निर्णय कायम ठेवला होता.

''प्रतिवादी ट्रस्ट हे एक मंदिर आहे आणि त्यामुळे ते उद्योग या संज्ञेच्या व्याख्येत बसत नाही, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती प्रसन्ना बी. वराळे यांच्या खंडपीठाने उच्च न्यायालयाच्या निकालात हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

# भारत-अमेरिका व्यापार करारामुळे शेतकऱ्यांवर विपरीत परिणाम होऊ शकतो, शरद पवारांची भीती

**आत्ताच एक्सप्रेस**

**बारामती** – भारत आणि अमेरिका यांच्यातील नव्या व्यापार करारामुळे आगामी काळात भारतीय शेतकरी आणि कृषी क्षेत्रावर विपरीत परिणाम होण्याची भीती राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी व्यक्त केली. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराचा सविस्तर मसुदा समोर येणे बाकी आहे. मात्र, तुर्तास ज्या काही गोष्टी समोर येत आहेत, त्यावरुन भारतीय शेतकऱ्यांसाठी काळजी करण्याचा विषय आहे, असे शरद पवार यांनी म्हटले. ते बुधवारी बारामती येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

या पत्रकार परिषदेत शरद पवार यांनी केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत भाष्य केले. त्यांनी म्हटले की, केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर होत असताना माझी गैरहजेरी कधीही राहिलेली नाही. मात्र, दुर्दैवाने अजित पवार यांचा अपघात झाल्याने मी दिल्लीला जाऊ शकलो नाही. त्यामुळे मला सभागृहात जाऊन अंदाजपत्रक ऐकता आले नाही. पण मी जे काही वाचलं त्यावरुन दोन-तीन गोष्टी लक्षात येतात. अर्थसंकल्पात सामान्य माणसाला यातना होतील, असा नवा कोणताही कर लादण्यात आलेला नाही, ही एक समाधानाची गोष्ट आहे. अंदाजपत्रकातून विकासाला गती येण्यासाठी आणखी काही ठोस पावलांची अपेक्षा होती, असे शरद पवार यांनी म्हटले.

शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराबाबतही भाष्य केले. अमेरिकेने भारताकडून निर्यात होणाऱ्या वस्तूंवरील करामध्ये कपात करण्याचा निर्णय घेतला. पण मला एक-दोन गोष्टींची चिंता वाटते. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार कराराचे चित्र आणखी एक दोन दिवसांत स्पष्ट होईल. यानंतर सविस्तर भाष्य करणं योग्य ठरेल. पण आता जे लोकांच्या समोर जे काही जाहीर करण्यात आलं आहे, त्यावरुन अमेरिकेला आता कृषी क्षेत्रात भारतात निर्यात करता येईल, अशी तरतूद या करारात आहे. ही गोष्ट भारतीय शेतकऱ्यांच्यादृष्टीने काळजी करण्यासारखी आहे. अमेरिका हा एक शक्तिशाली देश आहे. त्यांची आर्थिक ताकद जास्त आहे. त्यामुळे त्यांनी एखाद्या महत्त्वाच्या वस्तूचे उत्पादन अन्य देशांमध्ये निर्यात करायला सुरुवात केली तर त्याचा विपरीत परिणाम त्या देशाच्या संबंधित भागावर होतो. भारतीय कृषी क्षेत्रावर तसा विपरीत परिणाम होऊ नये, ही माझ्यासारख्यांची अपेक्षा आहे, असे शरद पवार यांनी म्हटले.

# नाशिक-अहिल्यानगर-सोलापूर महामार्गास केंद्राची मंजुरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**अहिल्यानगर** – केंद्रीय मंत्रिमंडळाने नाशिक अहिल्यानगर सोलापूरअक्कलकोट या ६ पदरी व प्रवेश-नियंत्रित (ॲक्सेस कंट्रोल्ड) ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पास मंजुरी दिली असून, हा निर्णय अहिल्यानगर जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा ठरेल. या प्रकल्पामुळे जिल्ह्याचा समावेश राष्ट्रीय दर्जाच्या द्रुतगती महामार्ग जाळ्यात होणार असून, दळणवळणाच्या दृष्टीने अहिल्यानगरला नवे महत्त्व प्राप्त होणार असल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली.

या महामार्गाची एकूण लांबी सुमारे ३७४ किमी. असून, सुमारे १९ हजार १४२ कोटींची गुंतवणूक या प्रकल्पासाठी करण्यात येणार आहे. 'पीएम गतीशक्ती' राष्ट्रीय मास्टर प्लॅनअंतर्गत विकसित होणारा हा महामार्ग पश्चिम किनारपट्टीपासून दक्षिण भारतापर्यंतचा एक महत्त्वाचा दळणवळण दुवा ठरणार आहे. परिणामी राज्यातील आणि देशातील प्रमुख आर्थिक केंद्रांशी अहिल्यानगरचा संपर्क अधिक वेगवान व सुलभ होणार आहे.

या प्रस्तावित महामार्गामुळे प्रवासाच्या वेळेत सुमारे ४५ टक्के घट होण्याची शक्यता असून, त्याचा थेट लाभ व्यापार, शेती आणि उद्योग क्षेत्राला मिळणार आहे. शेतमाल, दुग्धव्यवसाय तसेच कृषीपूरक उद्योगांच्या वाहतुकीवरील खर्चात लक्षणीय बचत होणार असून, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी (एमएसएमई) लॉजिस्टिक्स अधिक सक्षम होणार आहे. यासोबतच औद्योगिक, गोदाम, प्रक्रिया उद्योग आणि सेवा क्षेत्रात नव्या गुंतवणुकीस चालना मिळणार असल्याचे अपेक्षित आहे, असेही खासदार लंके यांनी सांगितले.

या प्रकल्पामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील युवकांसाठी थेट व अप्रत्यक्ष स्वरूपात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत. सुधारित दळणवळण व्यवस्था आणि वाढणारी औद्योगिक गुंतवणुकीलला चालणा मिळणार आहे. यामुळे जिल्ह्याचा आर्थिक पाया अधिक भक्कम होणार असून, अहिल्यानगर केवळ भौगोलिकदृष्ट्या नव्हे तर आर्थिक व औद्योगिकदृष्ट्याही केंद्रस्थानी येईल. या निर्णयाचे स्वागत करताना खासदार नीलेश लंके यांनी सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी हा महामार्ग अत्यंत निर्णायक ठरणार आहे. दळणवळण, व्यापार, शेती, उद्योग आणि रोजगार या सर्वच क्षेत्रांना या प्रकल्पामुळे नवी दिशा मिळेल. केंद्र सरकारने अहिल्यानगरच्या विकास क्षमतेवर दाखवलेला विश्वास महत्त्वाचा असून, या महामार्गाचा जिल्ह्याला जास्तीत जास्त लाभ मिळावा यासाठी केंद्र व राज्य पातळीवर सातत्याने पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# शरद पवारांनी घेतली सुनेत्रा पवारांची भेट

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे**– राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार हे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना भेटण्यासाठी निघाले असल्याची माहिती समोर आली आहे. बारामती येथील सहयोग सोसायटी येथे जाऊन शरद पवार सुनेत्रा पवारांची भेट घेणार आहेत. सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्यानंतर ही पहिलीच भेट असणार आहे. तसेच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असल्याच्या चर्चा रंगल्या असतानाच या भेटीकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. शरद पवार सहयोग सोसायटी येथे दाखल झाल्यानंतर त्यांनी अजित पवारांच्या प्रतिमेसमोर हात जोडून श्रद्धांजली अर्पण केली. सुरक्षा रक्षकाच्या हाताला हात धरुन शरद पवार पुढे आले. त्यानंतर, अजित पवारांच्या प्रतिमेसमोर डोकं खाली करुन हात जोडले. आपल्या लाडक्या पुतण्याला काकांकडून श्रद्धांजली वाहताना संपूर्ण पवार कुटुंबीय भावुक झाल्याचे पाहायला मिळाले.

# सुनेत्रा पवारांचे नेतृत्व मान्य करून शरद पवार गटाचे विलीनीकरण राष्ट्रवादीत करावे-आत्राम

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई**– उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे नेतृत्व मान्य करून शरद पवार गटाचे विलीनीकरण राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये व्हावे. जर विलीनीकरण व्हायचे असेल तर नेतृत्व फक्त सुनेत्रा पवार यांच्याकडेच असावे. शरद पवार गटातील नेत्यांनी राजकीय वास्तविकता मान्य करावी, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते धर्मराव बाबा आत्राम यांनी म्हटलं आहे.अजित पवार यांनी कधीच शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत विलीनीकरणाची चर्चा सुरू आहे असे सांगितले नव्हते, अशी चर्चा कधीच झाली नाही, असा दावाही धर्मराव बाबा आत्राम यांनी केला. ते पुढे म्हणाले की, सुप्रिया सुळे यांची भूमिका एकसंघ पक्षात काय असेल?? या जर तरच्या गोष्टी आहेत. राज्य आणि केंद्र ॲडजेस्टमेंट करता येईल. एकत्रित झाल्यानंतर कसे ॲडजस्टमेंट करायचे हे आमचे नेते करतील, असे ते म्हणाले. ते म्हणाले की, शरद पवार गटासोबत अजित पवारांची जी काही चर्चा झाली, ती महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणूक एकत्रित लढाव्या या संदर्भात होती. ती चर्चा फक्त स्थानिक पातळीवरील निवडणुका संदर्भात होती. दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाबद्दल नव्हती. त्यांनी सांगितले की, सुनेत्रा पवार अजितदादांच्या जागी उपमुख्यमंत्री झाल्या आहेत, आता राष्ट्रीय अध्यक्ष ही त्यांनीच व्हावे. प्रफुल्ल पटेल यांनीही ते राष्ट्रीय अध्यक्ष होणार नाही हे स्पष्ट केले. अजित पवार यांच्या नंतर मात्र दोन्ही पक्षांचे एकत्रीकरण व्हावे असे मला वाटते. धर्मराव बाबा आत्राम म्हणाले की, दोन्ही पक्षाच्या एकत्रीकरणानंतर एकसंघ राष्ट्रवादीचा नेतृत्व फक्त सुनेत्रा पवार यांच्याकडेच असावं. त्याच आमच्या राष्ट्रीय अध्यक्ष ही होतील आणि त्यांच्या नेतृत्वाखाली सर्वांना यायचे आहे. त्यांना आमच्या सोबत यायचे असेल तर त्यांनी एनडीए ची पॉलिसी स्वीकार केली पाहिजे. त्याप्रमाणे सुनेत्रा पवार यांचे नेतृत्व मान्य केले पाहिजे. सुनेत्रा पवार यांचे नेतृत्व शरद पवार गट मान्य करत असेल तर आम्हाला ही विलीनीकरणाबद्दल कुठलाही प्रॉब्लेम नाही. शरद पवार गटातील नेत्यांनी सध्याची राजकीय वास्तविकता स्वीकारावी.

# हळदीला नाचत होता अन् लग्नाच्या मुहूर्तावरच पोलिस नवऱ्या मुलाचे पलायन!

## नागसवाडी हादरली: पोलिस दलात कार्यरत नवरा लग्नाआधीच बेपत्ता, संपूर्ण तालुक्यात खळबळ

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट** – नागसवाडी (ता. किनवट) येथील एक घटना सध्या संपूर्ण तालुक्यासह जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे. शिस्त, कर्तव्य आणि जबाबदारीची शपथ घेतलेल्या पोलिस दलातील नवऱ्याने चक्क स्वतः च्या लग्नाच्या मुहूर्तावरच पलायन केल्याची धक्कादायक व लाजिरवाणी घटना उघडकीस आली आहे.

नागसवाडी येथील रहिवासी असलेला नवरा आणि मदनपूर येथील नवरी यांचा विवाह दिनांक ३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.५४ वाजता मदनपूर येथील महादेव मंदिर मंगल कार्यालयात पार पडणार होता. त्यासाठी दोन्ही कुटुंबांकडून जोरदार तयारी सुरू होती. सोमवारी रात्री हळदीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. डीजेच्या तालावर नवरा बेधुंद नाचत होता, चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. पाहुण्यांचे मनोरंजन सुरू होते, जेवणावळ सजली होती आणि लग्नाचा माहोल रंगात आला होता.

मात्र, हा आनंद फार काळ टिकला नाही. मंगळवारी पहाटे अचानक नवरा बेपत्ता झाल्याचे समोर आले. लग्नाचा मुहूर्त जवळ आला, पण नवरा मात्र गायब! क्षणातच आनंदाचे वातावरण गोंधळ, तणाव आणि भीतीत बदलले. ''नवरा गायब आहे'' ही बातमी वाऱ्यासारखी पसरताच मंडपात खळबळ उडाली. नवरीकडील नातेवाईकांना जबर मानसिक धक्का बसला, तर अनेकांनी संताप व्यक्त केला.



धक्कादायक बाब म्हणजे हा नवरा स्वतः पोलिस दलात कार्यरत आहे, तसेच नवरीही चंद्रपूर पोलिस दलात कार्यरत असल्याची माहिती आहे. पोलिस गणवेशातील व्यक्तीकडून असा गैरजबाबदारपणा घडल्याने समाजात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ''शिस्तीचा रक्षकच शिस्त मोडून पळाला'' अशी तीव्र चर्चा तालुक्यासह जिल्हाभर रंगली आहे.

नवरदेवाच्या वडिलांनी किनवट पोलिस ठाण्यात मुलगा बेपत्ता झाल्याची 'मिसिंग' तक्रार दाखल केली आहे. पोलिस निरीक्षक गणेश कडाड यांच्या मार्गदर्शनाखाली शोधमोहीम सुरू असून, नवरदेवाचा शोध घेण्यासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

दरम्यान, नवरीकडील नातेवाईकांची मोठी मानहानी झाली असून, हळदीपासून लग्नापर्यंतचा सगळा खर्च वाया गेला आहे. समाजात पोलिस दलाच्या प्रतिमेवरही या घटनेमुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कर्तव्य, निष्ठा आणि जबाबदारी यांची शिकवण देणाऱ्या दलातील व्यक्तीच अशा प्रकारे पळ काढत असेल, तर सामान्य नागरिकांनी काय अपेक्षा ठेवायच्या, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

या थरारक आणि नाट्यमय प्रकरणाचा शेवट काय होणार? पोलिस नवरा सापडणार की आणखी धक्कादायक सत्य समोर येणार? याकडे संपूर्ण तालुका आणि जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# विमान अपघातावर प्रश्न विचारला तर भाजपला राग का?; सुषमा अंधारे यांचा सवाल

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोलापूर** – शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताप्रकरणी पुन्हा एकदा भाजपवर निशाणा साधला आहे. अजित पवार हे राज्याची संपत्ती होते. त्यामुळे त्यांच्या विमान अपघातावर प्रश्न विचारला तर भाजपला राग का येतो? असे त्यांनी म्हटले आहे.

सुषमा अंधारे सध्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रचारासाठी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी तेथील एका प्रचारसभेत बोलताना भजापवर उपरोक्त प्रश्नांची सरबत्ती केली. त्या म्हणाल्या, मी प्रचाराचे काही बोलणार नाही. कारण, सोन्यासारखा माणूस आपल्यातून निघून गेला. अजितदादा राज्याची संपत्ती होते. ते म्हणतात ना की, लाख जावो, पण लाखोंचा पोशिंदा जगला पाहिजे. त्यामुळे हा प्रश्न विचारण्याचा राज्यातील प्रत्येक माणसाला हक्क आहे.

अजित पवारांच्या विमान अपघाताची माहिती उड्डयण नियामक मंडळाने दिली पाहिजे. पण भाजपच वेगळी उत्तरे देत आहे. या प्रकरणी अनेक प्रश्न अुत्तरीत आहेत. कुणाकडूनही ठोस उत्तर मिळत नाही. अजित पवारांचा घातपात झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. याचा भाजपला राग का येत आहे? आंतरराष्ट्रीय उड्डाण नियामक मंडळाने वर्षभरापूर्वी बंदी घातलेले विमान अजित पवारांच्या प्रवासासाठी का वापरले? अजित पवार स्वतःची फार काळजी घेत होते, ते हे विमान कसे वापरतील? असे विविध प्रश्न त्यांनी या प्रकरणी उपस्थित केलेत.

# हा पुतण्या वेगळा होता...!

अजितदादांचा इरादा नेमका काय होता..? दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आणण्याचा! ज्येष्ठ नेते तथा आपले काका शरद पवार यांचा अपमान होऊ नये, त्यांच्या उंचीचा मान त्यांना शेवटपर्यंत मिळत राहावा, याची काळजी त्यांनी आयुष्यभर घेतली. शरद पवारांपासून वेगळे होऊनही विधानसभेत यश मिळाले; तरी ''आता आपण स्वतःच्या हिमतीवर राजकारण करू शकतो'' असा अहंकार न बाळगता, काकांविषयीचे प्रेम आणि आदर दादांनी कायम ठेवले. यश मिळूनही अलीकडे राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची इच्छा त्यांनी उघडपणे व्यक्त केलीच, तसेच त्यासाठीची प्रक्रिया सुरू ठेवली.. महायुतीत, सरकारमध्ये सामील असतानाही अलिकडच्या निवडणुकांमध्ये भाजपविरोधी प्रचार सुरू केला- त्यातून विचारांची स्पष्टता दिसली आणि कलहीदादांचा कल काकांकडे आहे, शेवटच्या टप्प्यात काकांचा आदर राखण्याकडेच त्यांचे मन झुकले आहे, हे महाराष्ट्राने पाहिले- लोकांना ते मन जाणवले.. अजितदादांच्या आयुष्यात काकांशी मतभेदांचे अनेक प्रसंग आले. हे मतभेद प्रामुख्याने कार्यशैली आणि राज्यातील व्यक्तींविषयीच्या भूमिकांवर होते. उदाहरणार्थ, उदयनराजे भोसले यांना खासदारकीचे तिकीट देऊ नये; पक्षासाठी त्यांचा उपयोग होत नाही, उलट डोकेदुखी वाढते. जुन्या नेत्यांना ''सन्मान'' म्हणून पदे देण्याची प्रथा बंद व्हावी, जातींचे कार्ड खेळून पक्षाला सतत ब्लॅकमेल करणाऱ्या नेत्यांना दूर केले पाहिजे, सन १९९० पासून अजितदादांसोबत राजकारण सुरू केलेल्या राष्ट्रवादीतील नेत्यांना सत्तेत सामील करताना, त्यांच्या उपयुक्ततेनुसार-मेरिटवर पदे द्यावीत, आणि अलीकडे दबावामुळे काही निर्णय घ्यावे लागत आहेत- त्यामुळे पवारसाहेबांनी आता आराम करावा- मार्गदर्शन करावे- इत्यादी- अशा स्वरूपाचे हे मतभेद होते.. मुळात दोन पिढ्यांच्या विचारप्रक्रियेतला हा फरक (जनरेशन गॅप) यातून हे मतभेद निर्माण होत असत- सन २००४ च्या निवडणुकीनंतर मुख्यमंत्रीपदाची संधी असतानाही, त्या निवडणुकीत पुढे होऊन राहिलेल्या आर. आर. पाटील यांना किंवा पुतण्या म्हणून अजित पवारांना मुख्यमंत्री करण्याऐवजी, पक्षातील सर्व प्रकारच्या नेतृत्वाला बळ देण्यासाठी सर्व महत्त्वाची खाती घेत मुख्यमंत्रीपद काँग्रेसला देण्याचा शरद पवारांचा निर्णय अजितदादांना रुचला नाही. असे अनेक प्रसंग आहेत, ज्यातून अजितदादानी त्रास करून घेतला.. अती त्रास झाला की दादा 'नॉट रिचेबल' होत. पण पुन्हा परत येत, मन मोठे करून काकांच्या चरणी आपली निष्ठा वाहत. ''शेवटचा श्वास असेपर्यंत काकांना सोडणार नाही''.. ही भावना ते बोलून दाखवत- राज्यातील इतर पुतणे काकांशी कटुता येताच वेगळे झाले; या पार्श्वभूमीवर हा पुतण्या आयुष्यभर अ‍ॅडजस्ट करत राहिला, आपल्या काकांचं वय, वकूब आणि अधिकाराचा सन्मान करीत राहिला..अलीकडे शरद पवार निर्णय घेण्यास विलंब लावायचे- परस्परविरोधी निर्णय घ्यायचे- वयोमानाने धाडसी निर्णय घेण्याचे टाळायचे ही जाणीव ठेवून अजितदादांनी त्यांना गृहीत धरून एकतर्फी निर्णय घेतले नाहीत..अपवाद केवळ- विभाजनाचा.. पण त्यानंतर कटुता न आणता- एकत्र येण्याची पुन्हा प्रक्रिया सुरू केली.. भाजप प्रचंड बलवान होत असताना, अजित पवार प्रचंड आरोपांच्या जाळ्यात अडकलेले असताना, शिवसेनेप्रमाणे राष्ट्रवादीचा विभाजनाचा प्रयोग करण्यासाठी प्रचंड दबाव असताना, अत्यंत व्याकुळ होऊन समजुतीचा प्रयत्न करणारे दादा जनतेने पाहिले. ''पवारसाहेब मार्गदर्शक म्हणून राहतील, वय पाहता आराम करतील, तर तुम्हाला का नको रे..? असे व्याकुळ होऊन बोलताना त्यांची तगमग सर्वांनी पाहिली. अशी तगमग, द्विधा मनस्थिती आणि निर्णयांची गरज- दादांच्या राजकीय जीवनात असे असंख्य प्रसंग आले. त्यांचे संपूर्ण राजकीय आयुष्य अशा क्षणांनी भरलेले होते.. पण प्रत्येक वेळी- कोणत्याही परिस्थितीत, दादांचा पहिला आणि अंतिम प्रयत्न एकच, काकांचा आदर अबाधित राहावा. ''माझा काका लई मोठा'' ही भावना आयुष्यभर शब्दांनी नाही तर मनाने कायम ठेवलीकाकांशिवाय सत्तेत स्थिरावल्यानंतर, भाजपशी जुळवून घेतल्यानंतरही, काकांचा सन्मान आणि काकांचा पक्ष एकत्र करण्याचे मन आणि नियोजन त्यांनी ठेवले, ही साधी गोष्ट नाही..! दुर्दैवाने ते पूर्ण करण्याआधीच काळाने त्यांना गाठले. काकांचा आदर दादांची पत्नी आणि मुले पुढे ठेवतील का..? ही शक्यता सध्याच्या परिस्थितीत कमी दिसते. दादांच्या अनेक सहकाऱ्यांची कामे अडकलेली आहेत. ज्या समझोत्यावर दादा भाजपसोबत गेले, ती कामे अपूर्ण राहिली आहेत. आणि आजच्या परिस्थितीत सत्तेत राहण्याचा पर्याय सहजपणे कुणीही निवडेल, काकांच्या पक्षातील नेत्यांनाही त्यांच्यासह तो पर्याय हवा आहे/ होतातो काकांच्या शिवाय निवडला गेला आहे- भाजपने या संपूर्ण प्रक्रियेत आपल्या पुढील नियोजनाचा पहिला डाव यशस्वीपणे टाकला आहे.. असे असंख्य टाकलेले डाव भोवती असतानाही, अजित पवारांचा काकांविषयीचा आदर खरा होता, ओरिजिनल होता- म्हणून त्यांनी एकत्रित येण्याची प्रक्रिया सुरू केली- माहितीनुसार १२ डिसेंबरला काकांच्या वाढदिवशी ती भेट अजितदादांना काकांना द्यायची होती! खरे प्रेम आणि सन्मान असल्याशिवाय असा विचार करणे आणि आयुष्यभर त्यामध्ये सातत्य ठेवणे शक्य नसते..सख्ख्या मुलानेही एवढा सन्मान केला असता का..? कदाचित नाही!! काकांवर वडिलांपेक्षा अधिक प्रेम करू शकणारा -हा पुतण्या वेगळा होता!

# माणसे जपायची असतात पण आपण माणसांनाच वापरतोय!

''माणसे जपायची असतात आणि पैसा वापरायचा असतो; पण आज लोक पैसा जपतात आणि माणसे वापरतात.'' हे वाक्य केवळ तात्त्विक नाही, तर आजच्या समाजाचे अचूक एक्स-रे आहे. या एका ओळीत आपल्या सामाजिक अधःपतनाची, नात्यांच्या विघटनाची आणि मूल्यांच्या घसरणीची संपूर्ण कहाणी सामावलेली आहे. दुर्दैव इतकेच की, हे सत्य आपल्याला माहिती असूनही आपण त्याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहोत. आजचा काळ हा केवळ आर्थिक स्पर्धेचा नाही, तर मानवी मूल्यांवर चाललेल्या अदृश्य युद्धाचा काळ आहे. या युद्धात पैसा जिंकतो आहे आणि माणूस हरतो आहे. पैसा कधीच वाईट नव्हता. तो माणसाच्या गरजांसाठी निर्माण झालेला एक साधन होता पण साधन हळूहळू साध्य बनू लागले आणि साध्य असलेला माणूस उपयुक्ततेच्या निकषांवर तोलला जाऊ लागला. आज माणसाची किंमत त्याच्या संवेदनशीलतेवर नाही, तर त्याच्या आर्थिक क्षमतेवर ठरते. आज समाजात विचारले जाणारे प्रश्न बदलेले आहेत. ''तू कसा आहेस?'' यापेक्षा ''तू काय करतोस?'' ''किती कमावतोस?'' ''तुझा स्टेटस काय?'' हे प्रश्न महत्त्वाचे ठरले आहेत. या प्रश्नांमागे माणसाविषयीची आपुलकी नाही, तर त्याच्या उपयोगितेची चाचपणी आहे.

पूर्वी नाती भावनेवर उभी राहायची. आज ती व्यवहारावर टिकतात. आज प्रत्येक नात्यामागे एक अदृश्य अट असते जोपर्यंत उपयोग, तोपर्यंत संबंध. मित्र तेव्हाच जवळचा, जोपर्यंत तो कामाचा आहे. नातेवाईक तेव्हाच आपले, जोपर्यंत त्यांच्याकडून काही मिळणार आहे. कार्यकर्ता तोपर्यंत महत्त्वाचा, जोपर्यंत तो मतांमध्ये रूपांतरित होतो. कर्मचारी तोपर्यंत हवासा, जोपर्यंत तो 'प्रॉफिटेबल' आहे. आज माणूस माणूस म्हणून स्वीकारला जात नाही; तो गुंतवणूक म्हणून पाहिला जातो. जिथे 'रिटर्न' नाही, तिथे संबंध संपवायला कोणालाही अपराधीपणा वाटत नाही. ही मानसिकता केवळ अमानवी नाही, तर समाजघातकी आहे. महानगरे विस्तारत आहेत. उंच इमारती उभ्या राहत आहेत. स्मार्ट सिटी, स्मार्ट रोड, स्मार्ट लाईफ सगळं काही 'स्मार्ट' होत आहे. पण या स्मार्टपणात माणूस मात्र एकटा पडतो आहे. एकाच इमारतीत राहणारी माणसं एकमेकांना ओळखत नाहीत.

शेजाऱ्याचा मृत्यू मोबाईल नोटिफिकेशनद्वारे कळतो. दुःखाला वेळ नाही, संवादाला उसंत नाही, माणसाला थांबवायला कोणी नाही. संपर्क वाढले आहेत, पण संवाद संपले आहेत. नेटवर्किंग वाढले आहे, पण नाती तुटली आहेत. कारण वेळ जपायचा असतो माणसांसाठी नाही, तर पैशासाठी. कुटुंब ही माणूस जपण्याची पहिली शाळा असते. पण आज तिथेही व्यवहार शिरकाव करू लागला आहे. वृद्ध आई-वडील ''जबाबदारी'' वाटू लागतात. मुलं ''इन्व्हेस्टमेंट'' ठरतात. लग्न हे नातं न राहता 'सेटलमेंट' बनते. आज प्रश्न असा उरलेला नाही की आपण कुटुंबासाठी काय करतो, तर प्रश्न आहे, आपल्याला त्यातून काय मिळतं? ज्या दिवशी नात्यांमधून अपेक्षा वाढतात आणि समजूत कमी होते, त्या दिवशी कुटुंब कोसळायला सुरुवात होते.

आजच्या आर्थिक व्यवस्थेत माणूस आकड्यात बदलला आहे. कामगार म्हणजे 'कॉस्ट'. शेतकरी म्हणजे 'डेटा'. रुग्ण म्हणजे 'केस'. विद्यार्थी म्हणजे 'फीस'. माणसाच्या वेदना, त्याचा संघर्ष, त्याची कथा या सगळ्याला व्यवस्थेत स्थान नाही. कारण त्यातून थेट नफा मिळत नाही. आपण विकासाच्या नावाखाली व्यवस्था उभी करतो, पण त्या व्यवस्थेत माणूस बसतच नाही आणि मग प्रश्न पडतो, हा विकास नेमका कोणासाठी? राजकारणात माणूस मतदार असतो. निवडणुकीच्या काळात त्याच्यासाठी घोषणांचा पाऊस पडतो. आश्वासनांची खैरात होते. पण निकाल लागल्यानंतर तो पुन्हा विसरला जातो. लोकप्रतिनिधी जपले जातात, सत्ता जपली जाते, निधी जपला जातो पण माणूस मात्र वापरला जातो. लोकशाहीचा आत्मा माणसात असतो, पण आज लोकशाही केवळ आकड्यांमध्ये उरली आहे. आज ''वापरणे'' ही सवय झाली आहे, नात्यांचा वापर, भावनांचा वापर, माणसांचा वापर. जो माणूस प्रश्न विचारतो, तो त्रासदायक ठरतो. जो झुकतो, तो उपयुक्त ठरतो. ही संस्कृती माणसाला गप्प बनवते, संवेदनांना बोथट करते आणि समाजाला निर्दयी बनवते आणि शेवटी, हाच समाज एकाकी, अस्वस्थ आणि हिंसक बनतो. पैसा साठवता येतो, पैसा वारसा देता येतो, पैसा बँकेत सुरक्षित ठेवता येतो, पण माणूस? तो जपला नाही, तर निघून जातो आणि तो गेला, की परत येत नाही.

आयुष्याच्या शेवटी पैसा उपयोगी पडत नाही. तेव्हा आठवण येते ती माणसांची, ज्यांना आपण वेळ दिला नाही, जपलं नाही, समजून घेतलं नाही. वेळ आहे, दिशा बदलण्याची, आजही वेळ गेलेली नाही पण त्यासाठी आत्मपरीक्षण गरजेचं आहे. आपण पैसा जपतोय की माणसं, याचा विचार करायला हवा. पैसा वापरायला शिका शिक्षणासाठी, आरोग्यासाठी, समाजासाठी पण माणसं जपा, कारण समाज माणसांवर उभा असतो, नफ्यावर नाही. जर आपण आजही माणसांपेक्षा पैशाला महत्त्व देत राहिलो, तर उद्या आपल्या भोवती सर्व काही असेल. घर, गाडी, संपत्ती पण कोणीच आपलं नसेल. कारण पैसा साथ देत नाही. तो फक्त साक्षीदार असतो आपल्या अपयशाचा. म्हणून माणसे जपायची असतात कारण शेवटी माणूसच माणसाच्या कामी येतो.

**- प्रविण बागडे**
नागपूर

# मराठी शाळा व संस्कृती वाचवणार कोण?

मराठी शाळा टिकण्यासाठी आता हवी फक्त पालकांची इच्छाशक्ती व मानसिकतेत होणारा बदल आता मराठी शाळा टिकवू शकतात असं आयुक्तांनी स्पष्ट केलं आहे.

काही वर्षांपूर्वीची गोष्ट, मुंबईतील मराठमोळ्या ग्रँट रोड परिसरात राहणारे माझे मित्र किस्सा सांगत होते. मराठी भाषेचा अभिमान म्हणून त्यांनी त्यांच्या मुलीला ग्रँट रोड येथील एका नामांकित मराठी शाळेत प्रवेश घेतला. काही वर्षे गेल्यानंतर अचानक एक दिवस त्या शाळा व्यवस्थापनाने मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला व तसे पालकांना कळवले. माझे मित्र धडाडीचे कार्यकर्ते होते. ग्रँट रोड सारख्या मराठमोळ्या विभागातील नामांकित मराठी शाळा बंद पडते म्हणून त्यांनी थेट तेथील कार्यकर्त्यांना हाताशी धरले व शाळा व्यवस्थापनाला जाब विचारण्यासाठी शाळेत पोहोचले. प्रथम वादावादी झाल्यानंतर शाळा व्यवस्थापनाने नमती भूमिका घेतली व सुचवले की आम्ही मराठी शाळा सुरू ठेवण्यास तयार आहोत,फक्त तुमची जबाबदारी विद्यार्थी आणून देण्याची राहील, ते झाले तरच आम्ही शाळा सुरू करू शकतो, हे सांगताच सर्वच विषयावर पडदा टाकावा लागला. कारण त्यावर ना पालकांकडे उत्तर होते ना शाळा व्यवस्थापकांकडे. या सर्वाला जबाबदार होती ती पालकांची द्विधा मानसिकता. असो. विषय असा, की मराठी शाळा असो किंवा मराठी संस्कृती असो ती टिकवायची कोणी त्याचे खापर प्रशासनावर फोडायचे, की त्याची सर्वस्वी जबाबदारी आपण जनतेने घ्यावी का? याला नेमके जबाबदार कोण? घरात मराठी हवी मात्र बाहेर पडल्यावर हिंदी अथवा इंग्रजीतच बोलावे ही सध्याची मानसिकता. मग आपण प्रशासनाकडे का बोट दाखवायचे. त्यातही आपल्या आजूबाजूला मराठीसाठी व मराठी संस्कृती टिकण्यासाठी झटणारे बरेच असतात त्यातलंच एक मराठी अभ्यास केंद्र. आजच विषय का काढावा लागला कारण मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष दीपक पवार, अभिनेत्री आणि मराठी शाळांच्या सदिच्छादूत चिन्मयी सुमीत हे मराठी अभ्यास केंद्राचे कार्यकर्ते. यांनी नुकतीच पालिका आयुक्तांची भेट घेतली. कारण होते मराठी शाळा बंद पडण्याच्या विषयावर मुंबई महापालिका आयुक्तांची भूमिका काय? विषयाला चांगली सुरुवात झाली असताना मात्र आयुक्तांनी घुमजाव केले असा या मराठी अभ्यास केंद्राचा आरोप आहे. पालिकेच्या सहा शाळांचा खासगीकरणाचा मुद्दा यावेळी मांडण्यात आला. त्यात पालिकेच्या शाळा फक्त सीबीएससी व आयसीएससी का? यामुळे प्रादेशिक माध्यमांच्या शाळा बंद पडतील असा धोकाही व्यक्त करण्यात आला. यावर पालिका आयुक्त गगराणी यांच्या मते या सहा शाळांचा विषय म्हणजे शाळांचे खासगीकरण नाही तर भूखंडाचे खासगीकरण आहे. या चुकीच्या बातम्या असल्याचा त्यांनी उल्लेख केला. त्याबाबतचे सादरीकरण त्यांच्या माध्यमातून केले गेले. पालिकेकडे पडलेले भूखंड चटईक्षेत्र निर्देशानुसार बदल्यात जे उपलब्ध होतात तो हा विषय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपण मराठी शाळांचा आग्रह धरू नये का? असा प्रश्न विचारला तेव्हा गगराणी यांनी हा आग्रह आम्हाला धरायचा नाही असे स्पष्ट म्हटले व हा धोरणात्मक निर्णय असल्याचे सांगितले .

गगराणी यांनी मुंबईतील कुठलीही इमारत जीर्ण व धोकादायक झाली असल्यास त्याच काय करायचं हे महापालिकेचे धोरण आहे असे म्हटले. परंतु, शाळांची इमारत वर्षानुवर्षे पूर्ण होत नाही ही वस्तुस्तिथी आयुक्तांना पटली. पाडकाम करणाऱ्या शाळांच्या बाबतीत पालकांना विश्वासात घेतले जात नाही अशी भूमिका मांडली गेली असता गगराणी यांनी ही भूमिका बरोबर असल्याचे मान्य करत पालकांसोबत चर्चा करण्याचे निर्देश दिले. सगळी मुलं विस्थापित झाल्यानंतर महापालिकेने कारवाई करायला सुरुवात केली. दीड वर्षे मुलांची फरपट झाली ही भूमिका स्पष्टपणे मांडली. गगराणी यांनी समन्वयाचा अभाव असल्याबाबत मान्य केले. यानंतर समन्वयाचा अभाव राहणार नाही त्याबाबत काळजी घेण्याच्या सूचना दिल्या.

मुंबई पब्लिक स्कूलचा जो प्रयोग मुंबई महानगरपालिका करत आहे तो थांबवण्याबाबत महानगरपालिकेने पुढाकार घ्यायला हवा. सीबीएससी किंवा इतर मंडळाच्या ज्या शाळा आहेत त्या मराठी माध्यमाच्या सुरू करण्याबाबत याबाबत भूमिका मांडली व त्या काढण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने पुढाकार घ्यावा याबाबत चर्चा झाली. मराठी भाषा संवर्धन समिती स्थापन करण्याबाबत भूमिका मांडली गेली. अंगणवाड्यांसोबत जोडून घेऊन मराठी अभ्यास केंद्राला काम करता येईल का, याबाबत विचारणा करण्यात आली व प्रस्ताव ठेवण्यात आला. मुंबई महानगरपालिका मराठीसाठी जे काही काम करते त्याचे सादरीकरण करण्यात आले. त्याचं असं म्हणणं होतं की मुंबई महानगरपालिका मराठी शाळांसाठी काहीच करत नाही, असं जे चित्र उभं केलं आहे ते चुकीचं आहे. पालिका मराठीसाठी काय काय करतं याची जंत्रीच पालिका आयुक्तांनी मांडली. तर मुंबई महानगरपालिका परिपत्रक आदेश मराठी काढतात, विविध दिन साजरे करतात, विविध प्रकाशने काढतात, मराठीचा वापर, अभिनय स्पर्धा घेतात, साहित्य संमेलनाला मदत करतात, कर्मचाऱ्यांच्या विविध परीक्षा घेतात, प्रत्येक खात्यात मराठी भाषा अधिकारी नियुक्त केला आहे, पुस्तके विक्री करतात, नाट्यगृहामध्ये मराठी नाटकांना ५० टक्के सूट देतात, कर्मचाऱ्यांसाठी अभिनय स्पर्धा राबवतात गगराणी यांनी खासगी संस्थांच्या शाळा सुद्धा बंद पडत आहेत असं म्हटलं आहे. त्यांनाही तुम्ही विचारलं पाहिजे असं सुचवलं. मराठी शाळा का बंद पडत आहे.



हा सामाजिक प्रश्न आहे, असं त्यांचं म्हणणं होतं. फक्त आमच्या शाळेची संख्या कमी होत आहे असे नाही, तर इतर खासगी शाळा सुद्धा बंद पडत आहेत. गुणवत्ता वाढीसाठी केलेल्या प्रयत्नांमुळे मार्च २०२५ मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेत महानगरपालिकेच्या मराठी शाळांचा ९५ टक्के इतका निकाल लागला. महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीत ९७ टक्के इतके गुण पटकावले आहेत. यासोबतच गुणवत्ता वाढ, सराव परीक्षा असे उपक्रम राबविण्यात येतात. महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांकडून कोणत्याही स्वरूपाचे फी घेतली जात नाही. विद्यार्थ्यांना २७ प्रकारच्या शैक्षणिक वस्तूंचे मोफत वाटप केले जाते. महानगरपालिकेचा विद्यार्थी खासगी शाळेपेक्षाही अधिक गुणसंपन्न आणि त्याच्याकडे विविध शैक्षणिक सुविधा असाव्यात, यासाठी महानगरपालिका प्रयत्न करते. पालिकेने फाऊंडेशनल लिटरसी व न्यूमरसी निपूण भारतअंतर्गत महानगरपालिकेने केलेल्या प्रयत्नांमुळे तिसऱ्या इयत्तेतील प्रत्येक माध्यमाचा विद्यार्थी उत्तम प्रकारे वाचू शकतो. तसेच, त्या-त्या स्तरावरील गणिताचे ज्ञानही त्याला उत्तमरीत्या अवगत होत आहे. यासाठी महानगरपालिकेने विशेष प्रयत्न केले असून याच चांगले परिणाम दिसून येत आहे. मुंबईतील मराठी शाळा आणि शिक्षण हा सामजिक आणि शैक्षणिक मुद्दा आहे. पालिका प्रशासनाकडून कोणत्याही माध्यमांच्या शाळांचे खासगीकरण करण्यात आले नाही, असा दावा केला. तरीही मुंबई उपनगरातील मराठी शाळा बंद पडत आहेत ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. मराठी शाळा टिकण्यासाठी आता हवी फक्त पालकांची इच्छाशक्ती व मानसिकतेत होणारा बदल आता मराठी शाळा टिकवू शकतात अन्यथा आज पालिका आयुक्तांनी मराठी शाळेबाबत व सर्वस्वी मराठीबाबत आपले भूमिका मांडली. येणाऱ्या काळात ती मांडण्याची संधी मुंबईकरांना मिळणार नाही हे निश्चित.

**- अल्पेश म्हात्रे**
***

# शैलेश दातारांचा निडर पोलीस अवतार

विविध माध्यमांतून सातत्याने वैविध्यपूर्ण भूमिका करणारे अभिनेते शैलेश दातार आता एका महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखेत पहायला मिळणार आहेत. ६ फेब्रुवारीला प्रदर्शित होणाऱ्या 'केस नं. ७३' या चित्रपटात एसपी संजय देशमुख ही जिगरबाज आणि कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्याची भूमिका अभिनेते शैलेश दातार साकारणार आहेत.

एसपी म्हणून संजय देशमुख यांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत अत्यंत प्रामाणिकपणे काम केले आहे. त्याच्या पूर्ण सेवाकाळात एकही गुन्हा आजवर अनसॉल्व्ह राहिलेला नाही. प्रामाणिकपणा, कर्तृत्व आणि सरळ स्वभावामुळे संजय गावात लोकप्रिय आहे. मात्र, ऐन निवृत्तीच्या उंबरठ्यावर असताना त्यांच्याकडे एक अत्यंत गुंतागुंतीचा खटला येतो. ही केस सोडवण्याचे प्रचंड दडपण त्यांच्यावर आहे. धागेदोरे मिळत नाहीत आणि प्रत्येक क्षण त्यांच्यासाठी कसोटीचा ठरतो. धाडस, शिस्त आणि प्रामाणिकपणाचा प्रत्यय देणारी ही भूमिका कथानकाला वेगळी कलाटणी देणारी असणार आहे.

लायलॅक मोशन पिक्चर्स आणि डस्क स्टुडिओज निर्मित 'केस नं. ७३' हा मराठी चित्रपट ६ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन डॉ. मिलिंद मुक्तेश्वर आपटे यांनी केले असून चित्रपटाची निर्मिती शर्वरी सतीश वटक, डॉ. मिलिंद मुक्तेश्वर आपटे यांनी केली आहे. सहनिर्माते प्रविण अरुण खंगार आहेत.

जिगरबाज पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारायला मिळणं हे माझ्यासाठी नक्कीच आव्हानात्मक होतं. एकामागोमाग होणाऱ्या खूनाचा आणि त्यामागच्या गुन्हेगाराचा मागोवा घेताना निर्माण होणारं गूढ 'केस नं. ७३' चित्रपटात पहाता येणार आहे. स्टोरीमधील सस्पेन्स प्रेक्षकांना खिळवून ठेवणार आहे.

शैलेश दातार यांच्यासोबत अशोक शिंदे, राजसी भावे, नंदिता पाटकर, पियुष आपटे अशी तगडी स्टारकास्ट चित्रपटात दिसणार आहे.



# जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

## परिस्थितीशी दोन हात करत परीक्षेची तयारी करा, मुलाखतीसाठी विविध आयएएस अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** सध्याचे युग हे प्रचंड स्पर्धेचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपली ध्येयनिश्चिती करून नियोजनबद्ध अभ्यास करावा. परिस्थिती कोणतीही असो तिचा बाऊ न करता प्रयत्नरत राहिल्यास यश हमखास मिळते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आज येथे केले. शहरातील शिवाजीराव देशमुख सभागृहात आज जिल्हा प्रशासनाकडून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय सुविधा व मार्गदर्शन योजनांची माहिती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांची त्यांनी उत्तरे देताना तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांनी त्यांच्या आर्थिक, सामाजिक वा इतर कोणत्याही परिस्थितीचा बाऊ करू नये. येणाऱ्या परिस्थितीशी दोन हात करत ध्येय निश्चित करून ते गाठण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

यावेळी त्यांनी यूपीएससी, एमपीएससी तसेच इतर स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासाचे योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, सातत्यपूर्ण अभ्यास, चालू घडामोडींचे महत्त्व आणि आत्मविश्वास या बाबींवर भर दिला. अपयशातून खचून न जाता त्यातून शिकण्याची वृत्ती ठेवा, असे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले. केंद्रीय लोकसेवा आयोगाची स्पर्धा परीक्षा पास करू असा विश्वास व्यक्त करणाऱ्या विद्यार्थ्याने त्याची आर्थिक परिस्थिती तितकीशी चांगली नसल्याचे सांगून आई-वडिल परजिल्ह्यात कामानिमित्त गेले असल्याचे सांगत मन वळविण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली. त्यावर त्या विद्यार्थ्यास आत्मविश्वास असल्यास आई-वडिलांचे मन नक्कीच वळवू, असा विश्वास जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी दिला. या कार्यक्रमास विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, शिक्षकवर्ग तसेच अधिकारी उपस्थित होते.




विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना जिल्हाधिकाऱ्यांनी समर्पक उत्तरे देत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रद्युम्न गिरीकर यांनी केले.

# जिल्ह्यात 'कॉपीमुक्त हिंगोली' अभियान राबविणार-जिल्हाधिकारी राहुल गुप्ता

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर परीक्षांची शुचिता, पारदर्शकता व विश्वासार्हता कायम राखण्यासाठी जिल्ह्यात 'कॉपीमुक्त हिंगोली' हे विशेष अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली.




या अभियानांतर्गत सर्व परीक्षा केंद्रांवर कठोर दक्षता उपाययोजना राबविण्यात येणार असून भरारी पथके, स्थिर पथके, केंद्र संचालक व पर्यवेक्षक यांच्यामार्फत प्रभावी नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. परीक्षा काळात कॉपीप्रकरणांना आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही निरीक्षण, कागदपत्रांची काटेकोर तपासणी तसेच गैरप्रकार आढळल्यास तात्काळ कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

जिल्हाधिकारी गुप्ता यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांचे भवितव्य लक्षात घेता परीक्षा प्रक्रिया निर्भय व निष्पक्ष वातावरणात पार पाडणे हे प्रशासनाचे प्राधान्य आहे. त्यासाठी शिक्षण विभाग, पोलीस प्रशासन, महसूल विभाग तसेच केंद्रस्तरीय यंत्रणांमध्ये समन्वय ठेवून हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.

पालक, शिक्षक व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करून 'कॉपीमुक्त हिंगोली' अभियान यशस्वी करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी माहिती देताना सांगितले की, इयत्ता दहावीची परीक्षा दिनांक २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार असून जिल्ह्यातील ५४ परीक्षा केंद्रांवर १६ हजार ६८७ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. यापैकी ४ परीक्षा केंद्रे संवेदनशील आहेत. इयत्ता बारावीची परीक्षा दिनांक १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत होणार असून ३९ परीक्षा केंद्रांवर १५ हजार २४१ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. यामध्ये ७ परीक्षा केंद्रे संवेदनशील आहेत. दहावीच्या ५४ व बारावीच्या ३९ अशा सर्व परीक्षा केंद्रांवर प्रत्येकी एक बैठे पथक नियुक्त करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये मोफत कॅन्सर स्पेसिऐलिस्ट कंसल्टेशन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई–** कॅन्सरचे वाढते प्रमाण ओळखून मेडिकव्हर हॉस्पिटलने नागरिकांच्या सुदृढ आरोग्यासाठी पुढाकार घेत जागतिक कर्करोग दिना निमित्य मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये ४ ते ७ फेब्रुवारी पर्यंत मोफत कॅन्सर स्पेसिऐलिस्ट कंसल्टेशन चा उपक्रम हाती घेतला आहे . या उपक्रमाचे उदघाटन आज करण्यात आले . मेडिकव्हर हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉक्टर विशाल कुटे म्हणाले, आम्ही मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये लवकर निदान ,लवकर उपचार व प्रतिबंधात्मक उपाय योजना करता याव्यात यासाठी मेडीकव्हर हॉस्पिटलने संभाजीनगरच्या नागरिकांच्या सुदृढ आरोग्यासाठी मोफत कॅन्सर स्पेसिऐलिस्ट कंसल्टेशन चा उपक्रम हाती घेतला आहे .

मोफत कॅन्सर स्पेसिऐलिस्ट कंसल्टेशन मध्ये नागरिकांना डॉ. अनुप तोष्णीवाल, डॉ . आशुतोष तोंडारे , डॉ. रचिता बाहेती, डॉ . निकेत मंत्री , डॉ . आदित्य मंत्री यांच्याकडून तपासणी केली जाईल . या सोबतच कर्करोग तपासण्यांवर ५०% सूट दिली जाईल . ८ फेब्रुवारी पर्यंत दररोज तपासणी करता येणार आहे.या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन मेडिकव्हर हॉस्पिटल तर्फे केले गेले आहे . विनामूल्य मोफत कॅन्सर स्पेसिऐलिस्ट कंसल्टेशन लाभ घेण्यासाठी, नोंदणी क्रमांक – ०४०-६८३३४४५५ वर कॉल करू शकतात किंवा पुर्वनोंदणी करून सोमवार ते शनिवार,वेळ सकाळी १० ते संध्याकाळी ५ पर्यंत. छत्रपती संभाजीनगर येथील मेडीकव्हर हॉस्पिटल ला भेट देऊ शकतात.

## कोल्डस्टार लॉजिस्टिक्स आपला ठसा वाढवत आहे

**आत्ताच एक्सप्रेस**

**पुणे –** भारतातील सर्वात वेगाने वाढणारी तापमान-नियंत्रित पुरवठा साखळी समाधान प्रदाता, कोल्डस्टार लॉजिस्टिक्सने पुण्यात आपली दुसरी अत्याधुनिक कोल्डसाखळी सुविधा उघडली आहे. यामुळे महाराष्ट्रात प्रक्रिया आणि प्रक्रियेसह एफएमसीजी आणि फळे आणि भाज्यांच्या उत्पादन आणि वितरणावर कंपनीचे लक्ष आणखी मजबूत होईल.

चाकण फेज मध्ये स्थित, २,२०,००० चौरस फूट तापमान-नियंत्रित गोदाम जलद गतीने वाढणारी पुणे उपभोग बाजारपेठ आणि विश्वसनीय शीतगृह आणि प्रक्रिया पायाभूत सुविधांची वाढती प्रादेशिक मागणी पूर्ण करण्यासाठी बांधण्यात आले.

# जिल्हा वार्षिक योजना निधी मागणीचे प्रस्ताव तात्काळ सादर करावेत-जिल्हाधिकारी राहुल गुप्ता

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली –** जिल्हा वार्षिक योजना निधी मागणीचे प्रस्ताव सर्व विभागांनी तात्काळ सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी गं. गो. चितळे, प्रदीप नळगीरकर, समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त गीता गुठ्ठे यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.



जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत दायित्व व निधी मागणीचे परिपूर्ण प्रस्ताव तसेच जनसुविधांशी संबंधित दायित्वाचे प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. सन २०२४-२५ मधील दायित्वाच्या निधी मागणीचे प्रस्ताव संबंधित कामे पूर्ण झाल्याच्या अहवालासह दिनांक १५ फेब्रुवारीपर्यंत सादर करावेत. अन्यथा मार्च २०२६ नंतर निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

तसेच विविध विकास योजनांअंतर्गत वितरित करण्यात आलेला निधी विहित कार्यपद्धतीनुसार तातडीने खर्च करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या. या बैठकीत सन २०२५-२६ मधील नवीन कामांना प्रशासकीय मान्यता, निधी वितरण प्रक्रिया, सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना, पायाभूत सुविधा प्रकल्पांना युनिक आयडी देणे तसेच पुनर्विनियोजन प्रस्ताव यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

# लसणवाडी शिवारात हातभट्टी अड्डा उध्वस्त

## हातभट्टी दारू करणाऱ्या विरुद्ध धडक कारवाई सुरू

**आत्ताच एक्सप्रेस**

**श्रीक्षेत्र माहूर –** माहूर तालुक्यातील मौजे लसणवाडी या गावात महिना भरा खाली हातभट्टी काढण्याचे साहित्यसह अड्डा उध्वस्त करण्यात आला होता खबऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप अन्येबोईनवाड आणि पोलिसांनी लसणवाडी शिवारातील नाल्याकाठच्या खड्ड्यात धाड टाकून २०० लिटर रसायन सह हातभट्टी दारू काढण्याचे साहित्य दि ४ रोजी दुपारी २ वाजता नष्ट करण्यात आले

पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेला ऑपरेशन फ्लॅश आउट अंतर्गत अवैधरीत्या दारू विक्री हातभट्टी दारू सह इतर अवैध व्यवसायाच्या ठिकाणी धाडी टाकणे सुरू असून अनेक ठिकाणी मोठमोठे हात भट्टी दारूचे अड्डे उध्वस्त करण्यात आलेले आहेत मौजे लसणवाडी येथे याआधी असाच अड्डा उध्वस्त करण्यात आला होता खबर यांनी दिलेल्या माहितीनुसार दि चार रोजी जंगलाला लागून असलेल्या नाल्या तील खड्ड्यात दारू काढण्याचे साहित्य जमवल्याची माहिती मिळाली

पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी संदीप अन्येबोईनवाड पोहेका गोपनवाड पोहे का सत्यपाल मडावी पोका सोनसळे यांनी माहिती घेत नाला गाठून येथे जमविलेले २०० लिटर रसायन सह साहित्य नष्ट करत अज्ञाता विरुद्ध कारवाही प्रस्तावित केली आहे




# आदिवासी विकास योजनांची सर्वसमावेशक अंमलबजावणी करा-आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –**आदिवासी भागातील विकासकामांना प्राधान्य देत कामे जलद गतीने व कालमर्यादेत पूर्ण करावीत. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी सर्वसमावेशक आणि परिणामकारक पद्धतीने करण्याचे निर्देश आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी दिले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमाकरीता सन २०२६-२७ चे प्रारुप आराखडे तयार करण्यासाठी नऊ जिल्ह्यांची बैठक झाली. यामध्ये गडचिरोली, धुळे, नागपूर, अमरावती, अहिल्यानगर, नांदेड, गोंदिया, वर्धा, भंडारा या जिल्ह्यांचा समावेश आहे. या बैठकीस आमदार डॉ. किरण लहामटे, आमदार सुमीत वानखेडे, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, दूरदृश्य प्रणालीद्वारे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे, पणन मंत्री तथा धुळेचे पालकमंत्री जयकुमार रावल, राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, स्थानिक लोकप्रतिनिधी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प अधिकारी उपस्थित होते. आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके म्हणाले, आदिवासी विकास विभागामार्फत उपलब्ध होणारा निधी हा आदिवासी समाजासाठी व आदिवासी भागातच खर्च व्हावा. राणी दुर्गावती योजनेंतर्गत आदिवासी महिला बचतगटांना प्राधान्य देण्यात यावे. आदिवासी महिला बचतगटाच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीचे उदाहरण उभे करावे. जिल्ह्यातील किमान एक आश्रमशाळा 'मॉडेल आश्रमशाळा' म्हणून विकसित करावी. तसेच पीएम-जनमन आणि धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान या आदिवासी विकासासाठीच्या महत्त्वाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी.

# जागतिक कर्करोग दिनानिमित्त जनजागृती व तपासणी मोहीम

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी –** राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात जागतिक कर्करोग तपासणी मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. कर्करोगाविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी ०४ फेब्रुवारी हा दिवस 'जागतिक कर्करोग दिन' साजरा केला जातो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार यावर्षी हा दिवस एकजूट होऊ या, कर्करोगाला हरवूया'' या घोषवाक्यावर आधारित आहे.

जिल्हा रुग्णालय येथे जागतिक कर्करोग दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार होते. प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सारिका बडे उपस्थित होत्या. कार्यक्रमास निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्याण कदम, कर्करोग तज्ञ डॉ. मनोज मोरे, मुख्य अधिसेविका श्रीमती. सूर्यवंशी, प्राचार्य आशा घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते धन्वंतरी पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रास्ताविक बाह्यरुग्ण विभागातील परिसेविका सिस्टर निलपत्रेवार यांनी केले. सूत्रसंचालन मानसतज्ज्ञ केशव गव्हाणे यांनी तर आभारप्रदर्शन वैद्यकीय अधिकारी डॉ. शिल्पा मालपाणी यांनी केले.

कर्करोगावर उपचार घेऊन बरे झालेल्या रुग्णांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. सारिका बडे व डॉ. कल्याण कदम यांनी रुग्णांना कर्करोगाची लक्षणे दिसताच वेळेत तपासणी व उपचार घेण्याचे आवाहन केले. कर्करोग तज्ञ डॉ. मनोज मोरे यांनी उपस्थित रुग्ण व नर्सिंग विद्यार्थ्यांना कर्करोगाची लक्षणे, प्रतिबंध व उपचार याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

मुख कर्करोगाची लक्षणे म्हणून तोंडात गाठ, खवखव, जखम न भरणे, तोंड उघडताना अडचण येणे; स्तन कर्करोगासाठी स्तनात गाठ, स्तनातून स्त्राव; तर गर्भाशयमुख कर्करोगासाठी अनियमित रक्तस्राव, पाठदुखी व सतत थकवा ही लक्षणे असल्याचे सांगण्यात आले. ३० वर्षांवरील प्रत्येक व्यक्तीने नियमितपणे जिल्हा रुग्णालयात येऊन रक्तदाब व रक्तशर्करा तपासणी करून घ्यावी. योग्य वेळी निदान झाल्यास कर्करोग पुढील गंभीर अवस्थेत जाण्यापासून टाळता येतो, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागेश लखमावार यांनी केले.

यावेळी शासकीय परिचर्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले. उत्कृष्ट चित्रांसाठी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत जिल्ह्यात जागतिक कर्करोग तपासणी मोहीम राबविण्यात आली. एप्रिल, ऑगस्ट व डिसेंबर महिन्यात कर्करोग तपासणीसाठी मोबाईल वाहन द्वारे शहरी, तालुका व ग्रामीण भागात रुग्णांची तपासणी करण्यात आली. संशयित रुग्णांचे नमुने घेऊन बायोप्सी तपासणी करण्यात आली.




एप्रिल २०२५ मध्ये ८०६ मुख कर्करोग, ११३३ स्तन कर्करोग व ११३३ गर्भाशयमुख कर्करोग रुग्णांची तपासणी झाली. ऑगस्ट महिन्यात ३२६ मुख, ५३९ स्तन व ५२५ गर्भाशयमुख कर्करोग रुग्ण तपासण्यात आले. डिसेंबर महिन्यात ११८ मुख, ३३३ स्तन व ३३३ गर्भाशयमुख कर्करोग रुग्णांची तपासणी करण्यात आली. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानांतर्गत ४४,६५५ महिलांची तपासणी करण्यात आली. २,८५० मुख कर्करोग, १,७४६ स्तन कर्करोग व १,६८५ गर्भाशयमुख कर्करोग रुग्णांची तपासणी करण्यात आली. तसेच जिल्हा रुग्णालयात नियमित तपासणीअंतर्गत १०,९९४ मुख कर्करोग, ७,४७८ स्तन कर्करोग व ६,९६८ गर्भाशयमुख कर्करोग रुग्णांची तपासणी झाली. त्यापैकी ६६ मुख, ७९ स्तन व ८१ गर्भाशयमुख कर्करोग रुग्ण संशयित आढळून आले. यामधून २० मुख, २० स्तन, १९ गर्भाशयमुख तसेच १४ इतर कर्करोग रुग्णांचे निदान झाले.

# नांदेड जिल्ह्यात राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा डॉ.विजय कंदेवाड संचालक यांनी घेतला सखोल आढावा

आत्ताच एक्सप्रेस

**नांदेड** – आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड यांनी आज नांदेड जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयास भेट देऊन नांदेड जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी आयोजित आढावा बैठकीत त्यांनी आरोग्य विभागाच्या कामकाजावर सखोल चर्चा करत सेवा अधिक प्रभावी, दर्जेदार व लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या सूचना व मार्गदर्शन केले.




या बैठकीत सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियानावर विशेष भर देण्यात आला. अभियानांतर्गत जास्तीत जास्त नागरिकांची तपासणी करून त्यांना वेळेवर व योग्य उपचार उपलब्ध करून देण्याच्या सूचना आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड यांनी दिल्या. सिकलसेल आजाराच्या नियंत्रणासाठी तपासणी, समुपदेशन व उपचार या तिन्ही बाबी प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले. यासोबतच कुष्ठरोग व क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम, कुटुंब कल्याण योजना, माता व बाल संगोपन सेवा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया मोहीम, कॉम्प्रिहेन्सिव्ह हेल्थकेअर तसेच आयपीएचएस मानकांची प्रभावी अंमलबजावणी या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम ठरविलेल्या उद्दिष्टांनुसार राबविण्याचे व गुणवत्ता वाढविण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

या महत्त्वपूर्ण बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हिराणी, सह जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुटे, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. शिवशक्ती पवार, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, जिल्हा कुष्ठरोग अधिकारी डॉ. शेख बालन, आयुष अधिकारी डॉ. मुरमुरे तसेच जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी श्रीमती रेणुका दराडे उपस्थित होते.

या शिवाय सर्व राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचे अधिकारी, कर्मचारी व समन्वयक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ''आरोग्य सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परस्पर समन्वयाने काम करावे,'' असे स्पष्ट मार्गदर्शन आरोग्य सेवा संचालक डॉ. विजय कंदेवाड यांनी यावेळी केले.



# नालीसफाईला गती, नागरिकांना दिलासा; ''समस्या असेल तर मीच दारात येतो''-धीरज नेम्मानिवार

आत्ताच एक्सप्रेस

**किनवट**– प्रभाग क्रमांक १ मध्ये नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेत नगरसेवक प्रिती धीरज नेम्मानिवार यांचे प्रतिनिधी धीरज नेम्मानिवार यांनी नगर परिषद कर्मचाऱ्यांना थेट सूचना देत नालीसफाई करून घेतली. प्रभागातील नाल्यांमध्ये साचलेला कचरा, गाळ आणि घाणीमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता.

या पार्श्वभूमीवर धीरज नेम्मानिवार यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना कामाबाबत स्पष्ट सूचना देत तात्काळ नालीसफाईचे काम सुरू करून घेतले. त्यांनी प्रत्यक्ष ठिकाणी उपस्थित राहून कामावर लक्ष ठेवले. यावेळी बोलताना ते म्हणाले, ''समस्या असेल तर नागरिकांनी माझ्या दारात येण्याची गरज नाही; मीच त्यांच्या दारात जाऊन प्रश्न सोडवतो.''


या कारवाईमुळे परिसरातील नाले स्वच्छ झाले असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

लोकप्रतिनिधींच्या प्रतिनिधीने थेट पुढाकार घेतल्याने समस्या तात्काळ मार्गी लागली, अशी प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे. प्रभागातील स्वच्छता कायम ठेवण्यासाठी अशाच प्रकारे नियमित लक्ष दिले जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## तरोडा खुर्द येथे आज पासून अखंड हरिनाम सप्ताह

आत्ताच एक्सप्रेस

**नांदेड**– तरोडा खुर्द येथे अखंड हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ आज दिनांक ५ फेब्रुवारी रोज गुरुवारपासून होणार आहे अखंड हरिनाम सप्ताहात ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे.



सतत ७ दिवस चालणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहात काकडा, विष्णु सहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, भागवत कथा, हरिपाठ, हरी किर्तन, जागर आदी कार्यक्रम संपन्न होणार आहेत. सप्ताहात भागवताचार्य हभप दीनानाथ महाराज इंजनगांवकर यांची भागवत कथा,हभप त्र्यंबक महाराज दस्तापुरकर, धोंडोपंत महाराज सिंधीकर, बाबुराव महाराज कुदळेकर , व्येंकट महाराज दगडवाडीकर, अँड. यादव महाराज डाखोरे वाईकर, शंकर महाराज लोंढे, भाऊसाहेब महाराज पावडेवाडीकर, व शेवटचे काल्याचे किर्तन हभप काशिनाथ महाराज माने फुलकळसकर यांचे होणार आहे.

अखंड हरिनाम सप्ताहात विणेकरी हभप बाबुराव महाराज कल्याणकर, मृदंगाचार्य विश्वजीत महाराज आळंदीकर, ज्ञानेश्वर माऊली धोतरेकर, गायनाचार्य शंकर माऊली रेगांवणकर, मुरलीधर दिवटे, गणेश राव पळशीकर, रमेशराव पावडेवाडीकर, माधव वसेकर, विश्वनाथ

वाखरीकर, बाबुराव रहाटीकर, शिवाजी मार्कंडकर, नागोरावजी पिंपळेकर, लालजी माळपुरकर, राजाभाऊ ताडलिंबाळकर व तसेच महापूजा व अभिषेक सतीश महाराज मठपती यांचा सहभाग राहणार आहे. आयोजित अखंड सप्ताहातील सर्व कार्यक्रमास तरोड्यासह नांदेड शहरातील भावीक भक्तांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन तरोडा खुर्द ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वन्य प्राण्यांकडून रब्बी पिकांची धुमाकूळ नासधूस

## शेतकरी आर्थिक संकटात, वनविभागाकडून दुर्लक्षाचा आरोप

आत्ताच एक्सप्रेस

**हिमायतनगर** – तालुक्यातील सततच्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील हातचा घास निसटल्याने शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील पिकांवर मोठ्या आशेने पेरणी केली. मात्र रब्बी हंगाम सुरू होताच वन्य प्राण्यांनी पिकांवर हल्ला चढवून शेतकऱ्यांच्या स्वप्नांवर पाणी फेरले आहे. रब्बी पिकांची मोठ्या प्रमाणात नासधूस होत असल्याने शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला आहे.

तालुक्यातील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणात पेरणी केली होती. मात्र पिकांची स्थिती चांगली असतानाच वन्य प्राण्यांनी पिकांची प्रचंड प्रमाणात नासधूस सुरू केली आहे. या हल्ल्यांमुळे उत्पादनात मोठी घट होऊन शेतकऱ्यांना जबर आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. आधीच कमी उत्पादन आणि शेतमालाला योग्य दर न मिळाल्याने शेतकरी आर्थिक विवंचनेत असताना आता वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांनी त्यांची परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे.

गेल्या वर्षी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली होती. त्यामुळे खरीप हंगाम पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. यंदा पुन्हा एकदा निसर्गाच्या मारासह वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत आहे. पेंगंगा नदी पात्र सोडले तर रब्बी हंगामात इतर भागात फारशी पेरणी झाली नव्हती. मात्र गेल्या वर्षी या भागातही अतिवृष्टी झाली होती. त्यामुळे शेतकरी पुन्हा एकदा आर्थिक अडचणीत सापडला आहे.

शेतकरी सातत्याने नैसर्गिक संकटांचा सामना करत आहे. गेल्या वर्षी सुद्धा अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे आधीच कर्जबाजारी झालेला शेतकरी पुन्हा आर्थिक अडचणीत सापडला आहे. अतिवृष्टीने खरीप हंगाम हाती गेला, आता रब्बी हंगामातील पिकेही वन्य प्राण्यांनी फस्त केल्याने शेतकरी पूर्णपणे हतबल झाला आहे.

रब्बी पिकांची पेरणीपासून ते आजपर्यंत थंडी, हवा आणि इतर नैसर्गिक संकटांचा शेतकऱ्यांनी यशस्वीपणे सामना केला. त्यामुळे रब्बी पिकांची स्थिती समाधानकारक होती. मात्र रब्बी हंगामात अचानक वन्य प्राण्यांनी पिकांवर मोठ्या प्रमाणात हल्ले सुरू केल्याने परिस्थिती गंभीर बनली आहे. जंगलालगत असलेल्या शेतशिवारात तर पिके पूर्णतः उद्ध्वस्त होत आहेत. काही ठिकाणी तर एकाही रात्रीत संपूर्ण पीक नष्ट होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांबाबत शेतकऱ्यांनी वारंवार वनविभागाकडे



तक्रारी करूनही त्याची दखल घेतली जात नसल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. नुकसानभरपाई, संरक्षणात्मक उपाययोजना किंवा तातडीची मदत मिळत नसल्याने शेतकरी अधिकच संतप्त झाला आहे. वनविभाग रब्बी हंगामातील पिकांकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याचा अनुभव शेतकऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे.

रब्बी हंगामातील पिकांची सध्याची स्थिती पाहता उत्पादन चांगल्या प्रकारे हाती येण्याचे संकेत होते. मात्र वन्य प्राण्यांच्या उपद्रवामुळे शेतकरी पुन्हा एकदा संकटात सापडला आहे. वेळेत ठोस उपाययोजना न केल्यास तालुक्यातील रब्बी हंगाम पूर्णतः उद्ध्वस्त होण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

# जामा मस्जिद परिसरात खाली लोंबकळणाऱ्या विद्युत तारांमुळे अपघाताचा धोका वाढला, तात्काळ दुरुस्तीची नागरिकांची मागणी

आत्ताच एक्सप्रेस

**माहूर** – येथील जामा मस्जिद परिसरात विद्युत वितरण कंपनीच्या काही तार अत्यंत खाली लोंबकळत असल्याने नागरिकांसह नमाजासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या विद्युत तारांमुळे कोणत्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता असून, त्यामुळे जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान होण्याचा धोका वाढल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.



जामा मस्जिद परिसरात दिवसभर मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते. पावसाळ्यात तसेच मोठ्या वाहनांच्या ये-जा दरम्यान या विद्युत तारांना स्पर्श होण्याची शक्यता अधिक वाढते. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी संबंधित विद्युत तार उंच करणे, दुरुस्ती करणे किंवा इतर सुरक्षित उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी नगराध्यक्ष व नगरसेवकांकडून निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या संदर्भात त्यांनी कार्यकारी अभियंता शिंदे यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले. दरम्यान, दि. १८ फेब्रुवारी २०२६ पासून रमजान महिना सुरू होत असून, या कालावधीत पहाटे सहेरी, सायंकाळी इफ्तार तसेच रात्री तरावीह नमाजासाठी मोठ्या संख्येने भाविक जामा मस्जिद परिसरात येतात. अशा वेळी नियमित व अखंडित वीजपुरवठा अत्यावश्यक आहे. मात्र मागील काही दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने रमजान काळात विशेषतः पहाटे व सायंकाळी वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच वॉर्ड क्रमांक ६ व १० मध्ये नवीन डीपी कार्यान्वित करून दीर्घकाळ प्रलंबित असलेली वीज समस्या मार्गी लावावी, अशी मागणीही निवेदनात नमूद करण्यात आली आहे. या निवेदनावर नगराध्यक्ष फिरोज दोसानी, बांधकाम सभापती मस्रत फातिमा अब्दुल रफिक सौदागर, नगरसेविका शकीलाबी शब्बीर सैय्यद तसेच नगरसेविका लतीफा मस्तान शेख यांच्या सह्या असून, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने कारवाई करावी, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली आहे.



# शिवणी गावाचे नाव उज्ज्वल; बीएसएफ व सीआरपीएफमध्ये निवड झालेल्या जवानांचे शिवाणीत जंगी स्वागत

आत्ताच एक्सप्रेस

**शिवणी (किनवट)**– किनवट तालुक्यातील अतिदुर्गम भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शिवणी गावातील साईनाथ बेलयवार यांची सीमा सुरक्षा दलात तर अजय धुमाळे यांची केंद्रीय राखीव पोलीस दलात नियुक्ती झाल्याने शिवणी गावाचा नावलौकिक झाला आहे. दोन्ही तरुणांनी आपले प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून पहिल्यांदाच आपल्या जन्मभूमीत आगमन केल्याने गावकऱ्यांनी त्यांचे जंगी स्वागत केले.

शिवणीसारख्या दुर्गम भागात प्राथमिक शिक्षण पूर्ण करून या दोघांनी कठोर परिश्रम, जिद्द व चिकाटीच्या जोरावर उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्यामुळे शिवणी गावाचे नाव तालुक्यासह जिल्हास्तरावर झळकले आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे शेतकरी मल्लेश बेलयवार यांचे पुत्र साईनाथ बेलयवार हे आई-वडिलांचे एकुलते एक अपत्य असतानाही, परिवाराने देशसेवेच्या भावनेतून त्यांना सीमा सुरक्षा दलात पाठविण्याचा धाडसी निर्णय घेतला. या निर्णयाबद्दल बेलयवार कुटुंबाचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

तर दुसरीकडे, रेडिओ दुरुस्तीचे काम करून आपल्या मुलाचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी पंडित धुमाळे यांनी मोठे कष्ट घेतले. कोणतीही ठोस आर्थिक साधनसामग्री नसताना बेलयवार व धुमाळे कुटुंबीयांनी आपल्या मुलांना शिक्षण व संस्कार दिले. या शिक्षणातून साईनाथ बेलयवार व अजय धुमाळे यांनी मिळवलेले यश शिवणीसह परिसरातील विद्यार्थ्यांसाठी व सुशिक्षित बेरोजगारांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

याच अनुषंगाने ४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी शिवणी गावात दोन्ही जवानांच्या सन्मानार्थ भव्य मिरवणूक काढून सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास गावातील सामाजिक, राजकीय कार्यकर्ते, शेतकरी, व्यापारी, कर्मचारी, शिक्षकवृंद तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

हा सत्कार समारंभ यशस्वी करण्यासाठी गावातील नवतरुण मंडळांनी पुढाकार घेतला. या दरम्यान संपूर्ण गावात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. हा स्वागत समारंभ केवळ सन्मानाचा नसून कृतज्ञता, प्रेरणा आणि देशप्रेमाचा उत्सव असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

या जवानांकडून तरुण पिढीने प्रेरणा घ्यावी, देशसेवा, शिस्त आणि जबाबदारीची जाणीव ठेवावी, असे मत यावेळी अनेक मान्यवरांनी व्यक्त केले.

# रमझान सणाच्या पार्श्वभूमीवर नगर परिषदेकडे सविस्तर मागण्यांचे निवेदन

आत्ताच एक्सप्रेस

**किनवट** – येणाऱ्या पवित्र रमझान महिन्याच्या पार्श्वभूमीवर किनवट नगर परिषदेतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते अभय नगराळे यांनी नगर परिषद प्रशासनास प्रभाग क्रमांक ४ सह शहरातील मुस्लिम बहुल भागांमध्ये आवश्यक नागरी सुविधा व उपाययोजना तातडीने राबविण्याबाबत सविस्तर निवेदन सादर केले आहे.

रमझान महिन्यात मुस्लिम समाजात रोजा, नमाज, तरावीह व इफ्तार यांसारख्या धार्मिक कार्यक्रमांसाठी मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते. त्यामुळे सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, दिवाबत्ती व आरोग्य विषयक सुविधा सुचारू राहणे अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनात प्रामुख्याने प्रभाग क्रमांक ४ तसेच शहरातील सर्व मुस्लिम बहुल परिसरात दररोज नियमित स्वच्छता, कचरा उचल, नाल्यांची साफसफाई व औषध फवारणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच रमझान कालावधीत पाणीपुरवठा नियमित व पुरेशा दाबाने करण्यात यावा, पाणीटंचाई भासणाऱ्या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यासोबतच शहरातील बंद व खराब अवस्थेतील पथदिवे तात्काळ दुरुस्त करून



सर्व स्ट्रीट लाईट सुरू ठेवावेत, मशिदी व इफ्तार स्थळांच्या परिसरात अतिरिक्त प्रकाश व्यवस्था करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. अंतर्गत रस्ते, गल्लीबोळ व मशिदीकडे जाणारे मार्ग स्वच्छ व सुस्थितीत ठेवण्याबाबतही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. नगर परिषद क वर्ग अंतर्गत उपलब्ध असलेल्या सर्व यंत्रणा, मनुष्यबळ व संसाधनांचा वापर करून रमझान काळात नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, तसेच शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, अशी अपेक्षा गटनेते अभय नगराळे यांनी व्यक्त केली आहे. नगर परिषद प्रशासनाने या मागण्यांची तातडीने दखल घेऊन रमझान सणाच्या पार्श्वभूमीवर योग्य व नियोजनबद्ध उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813